
देश विदेशाच्या जीवजंतूंच्या लोककथा

# अस्वलाची शेपटी कशी नाहिशी झाली



# अस्वलाची शेपटी कशी नाहिशी झाली

अस्वल पृथ्वीवरील अत्यंत लोकप्रिय प्राणी आहे. इथे आम्ही एक अशी लोककथा प्रस्तुत करीत आहोत जी जर्मनी आणि उत्तर अमेरिकेच्या इरोक्वीस जनजातीमध्ये प्रचलित आहे. इतर गोष्टींपेक्षा वेगळी सुद्धा आहे. या गोष्टीत ही माहिती दिली आहे की अस्वलाने आपली शेपटी कशी गमावली.


**Santhini Govindan**

*Marathi Translation*

**Madhuri Tillu**

Illustrated By:


**Prasonjit**



PANDA

An imprint of Unicorn Books

तुम्हाला माहिती आहे का की पूर्वी अस्वलाच्या शरिराला चांगली लांब आणि झुपकेदार शेपटी असायची. अस्वलाला आपल्या शेपटीचा खूप अभिमान होता. चालताना तो मोठ्या तोऱ्यात आपल्या शेपटीला अशा प्रकारे हलवायचा की जणू काही विचारतो आहे की आहे का दुसऱ्या कुणाची इतकी मजबूत आणि सुंदर शेपटी? अस्वलाच्या अशा खट्याळपणामुळे बरेचसे प्राणी त्याचा द्वेष करु लागले. त्यांच्यात प्रमुख होता कोल्हा, ज्याला स्वतःला आपल्या शेपटीबद्दल मोठा अभिमान होता. त्यानी अस्वलाला धडा शिकवायचा निश्चय केला.



थंडीचा मोसम होता. सगळीकडे खूप हिमपात झाला होता. बर्फामुळे तलाव, सरोवर गोठून गेले होते. मुलूखभर बर्फाची जणू काही जाड चादरच अंथरली होती. कोल्ह्याला माहिती होतं की अस्वल भुकेलं असेल आणि आपला आहार शोधायला गुहेतून बाहेर जरूर जाईल. म्हणून तो अस्वलाच्या आधीच शिकारीला निघाला. त्यानी तलावावर गोठलेलं बर्फ दूर केलं. एक खड्डा खोदला व त्यात डोकं घालून बर्फाच्या खाली मासोळ्या पकडण्याचा प्रयत्न करू लागला. त्याच वेळी त्याला अस्वल येताना दिसलं. ते येईपर्यंत कोल्ह्यानी बऱ्याच मासोळ्या जमा केल्या होत्या.



अस्वल कोल्ह्याजवळ पोहोचलं. त्यानी मासोळ्या पाहिल्या. त्याच्या तोंडाला पाणी सुटलं. तो म्हणाला, "अरे कोल्होबा, तू इतक्या स्वादिष्ट मासोळ्या कुठून पकडल्यास?" "तलावाच्या पाण्यातून, आणखी कुठून पकडणार?" कोल्हा अभिमानाने म्हणाला. "पण कशा काय पकडल्यास? तुझ्याजवळ मासोळ्या पकडायचं हत्यार आहे का?"



‘‘माझी शेपटीच माझं हत्यार आहे. तिच्याच मदतीने मी इतक्या मासोळ्या पकडल्या.’’ हे सांगताना कोल्ह्याच्या आवाजाला अभिमानाचा मुलामा होता.

‘‘मी पण आपल्या शेपटीच्या मदतीने मासोळ्या पकडू शकतो का?’’ अस्वलानी उत्सुकतेने विचारलं.



कोल्हा म्हणाला, “हो! हो! कां नाही? तुझी जर इच्छा असेल तर माझ्या सारखा आपल्या शेपटीच्या मदतीने ढिगांनी मासोळ्या पकडू शकशील.”

“काय? खरंच का? कोल्होबा, तू मला सांग ना की शेपटीच्या मदतीने मी कसा मासोळ्या पकडू शकतो?” अस्वलाने विचारले. कोल्ह्याने सांगायला सुरुवात केली. “फारच सोपी युक्ती आहे. आधी बर्फात एक खड्डा खोदायचा.



नंतर त्या खड्ड्यात आपली शेपटी घालून बसून रहायचं. शेपटीला थोडं थोडं हलवत रहायचं. हलणाऱ्या शेपटीमुळे आकर्षित होऊन, एखादी खाण्याची वस्तू समजून मासोळ्या तुझ्या शेपटीजवळ येतील.

तुला जेव्हा शेपटीला हालचाल होताना जाणवेल तेव्हा पटकन् शेपटी ओढून घे. मासोळी पण शेपटीबरोबर ओढली जाईल." " असं करणं तर फारच सोपं आहे." अस्वल म्हणालं, "मी आत्ता खड्डा खोदतो." अस्वल खड्डा खोदायला तयार झाला तर कोल्ह्यानी त्याला अडवलं. "थांब अस्वला," तो म्हणाला, "इथे खड्डा खोदून काही फायदा नाही. इथे फार कमी मासोळ्या राहिल्या आहेत.



9681
गरवारे बालभवन
पुणे

मी तुला अशा ठिकाणी नेतो जिथे ढिगांनी मासोळ्या आहेत.''
मूर्ख अस्वलाला कोल्ह्याची चलाखी समजली नाही. कोल्हा त्याला अशा जागी घेऊन गेला जिथे थंड हवा येण्यास काही अडथळा नव्हता. हे ठिकाण पहिल्यापेक्षा जास्त थंड होतं.


कोल्हा म्हणाला, ''इथे खड्डा खोद आणि जसं मी तुला सांगितले त्याप्रमाणे करशील तर तुला भरपूर मासोळ्या मिळतील.''



अस्वलानी खड्डा खोदला आणि त्यात आपली शेपटी घालून बसून राहिला. त्याला तिथे बसवून कोल्हा निघून गेला. पूर्ण रात्र अस्वल त्याच जागी बसून राहिलं. रात्री जोरदार बर्फ पडलं. मासोळ्या मिळण्याच्या लालसेमुळे अस्वल तिथून जराही हललं नाही.



सकाळी कोल्हा पुन्हा त्याच्या जवळ आला आणि म्हणाला, "काय अस्वला, किती मासोळ्या पकडल्या तू?" "एक पण नाही," अस्वलानी म्हटलं. "मी इथे बसल्या बसल्या फार दुः खी झालो. भूक फार जोरात लागली आहे."



कोल्हा म्हणाला, "तर मग शेपटी खेचून पाहून का घेत नाहीस? होऊ शकतं दोन-चार मासोळ्या शेपटीला चिकटल्या असतील!"


अस्वलानी आपली शेपटी ओढून पाहिली. पण ती जराही हलली नाही.



रात्रभर बर्फ पडल्यामुळे खड्डा बर्फानं गोठून दगड झाला होता. अस्वलाने जास्त जोर लावून शेपटी ओढली तर ती तुटूनच गेली. अस्वल बिना शेपटीचं झालं. ते रागानी कोल्ह्याला मारायला धावलं पण धूर्त कोल्हा वेगाने तिथून पळाला. अस्वल दात ओठ खात राहिलं.





बस, तेव्हापासून अस्वलाची शेपटी नाहीशी झाली ती आजपर्यंत पुन्हा आलीच नाही. तेव्हापासून अस्वलाला कधी शेपटी नसते.




# Animal Folk Tales from Around the World





Available
in English, Hindi, Marathi, Bangla, Bhojpuri




Folktales

ISBN10:81-7806-258-5
ISBN978-81-7806-258-7

9 788178 062587

₹ 56

U 2587

PANDA
An imprint of Unicorn Books